# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## राज्याचे मुख्य सचिव श्री राजेश अग्रवाल यांची मेट्रो भवनला भेट




नागपूर: राज्याचे मुख्य सचिव श्री राजेश अग्रवाल यांनी मेट्रो भवन ला शनिवारी भेट दिली. नुकताच मुख्य सचिव पदाचा पदभार संभाळल्यावर श्री राजेश अग्रवाल यांचा हा पहिलाच मेट्रो दौरा होता. या दौऱ्याचा भाग म्हणून श्री अग्रवाल यांनी दुपारी आधी नागपूर मेट्रो तर्फे CRF योजनेंतर्गत राबवल्या जात असलेल्या क्रेझी कॅसल आणि फुटाळा प्रकल्पाचा दौरा केला. या दरम्यान त्यांनी या दोन्हीही प्रकल्पांसंदर्भात सविस्तर माहिती तसेच एकूणच सद्यस्थिती जाणून घेतली.

या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात श्री अग्रवाल यांनी संध्याकाळी मेट्रो भवन ला भेट दिली. या निमित्ताने मुख्य सचिव यांनी संपूर्ण मेट्रो भवन इमारतीची आणि तसेच येथील विविध भागांची पाहणी केली. विशेष म्हणजे मेट्रो भवन येथील ऑपरेशन कमांड सेन्टर (OCC) ची देखील त्यांनी सविस्तर माहिती

घेतली. OCC च्या माध्यमाने मेट्रो गाड्यांच्या आवागमन वर पूर्णपणे लक्ष कश्या प्रकारे ठेवता येते याचे प्रात्यक्षिक त्यांना देण्यात आले.

मुख्य सचिव श्री राजेश अग्रवाल यांना नागपूर मेट्रो संबंधी सदरीकरण देण्यात आले. यात नगर मेट्रोच्या एकूणच पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्या संबंधी सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच फिडर सेवेन्तर्गत घेतल्या जाणाऱ्या विविध उपाय योजनांची माहिती देण्यात आली. मेट्रो प्रकल्पाचे काम सुरळीतपणे आणि अपेक्षित त्या गतीने सुरु असण्यासंबंधी घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती देखील या सादरीकरणात देण्यात आले. महा कार्डवर मिळणारी सवलत, टप्पा-२ च्या कामाची प्रगती अश्या विविध विषयांवर त्यांना माहिती देण्यात आली.

मेट्रोच्या एकूणच कामासंबंधी नियोजन कसे असते किंवा कामाची एकत्रित माहिती डॅशबोर्डच्या माध्यमाने कशी मिळते याचे देखील सादरीकरण करण्यात आले. मेट्रो भवन येथील सादरीकरणानंतर मुख्य सचिव श्री राजेश अग्रवाल यांनी मेट्रने प्रवास केला. रहाटे कॉलोनी मेट्रो स्टेशन ते सीताबर्डी इंटरचेंज आणि सीताबर्डी इंटरचेंज ते कस्तुरचंद पार्क मेट्रो स्टेशन दरम्यान त्यांनी प्रवास केला.  सीताबर्डी इंटरचेंज येथे एका मार्गिकेवरून दुसऱ्या मार्गावर प्रवास करताना प्लॅटफॉर्म बदलावा लागतो याची देखील त्यांनी पाहणी केली.

मुख्य सचिव श्री राजेश अग्रवाल यांचे स्वागत महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री श्रवण हर्डीकर यांनी केले. महा मेट्रो संचालक (स्ट्रॅटेजिक प्लांनिंग) श्री अनिल कोकाटे, संचालक (वित्त) श्री हरेंद्र पांडे, संचालक (प्रकल्प) श्री राजीव त्यागी आणि इतर अधिकारी उपस्थित होते.



